<u>नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत प्राप्त प्रस्ताव मंजुरी देण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः नपुयो-२०१६/प्र.क्र.२२७/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ जुलै, २०१६

<u>वाचा</u> : जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक : नपुयो - २०१६/ प्र.क्र ३७० / जल-७, दिनांक ८ डिसेंबर २०१५.

<u>प्रस्तावना :</u>

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत नदी/ओढा / नाला या मधील गाळ काढ़णे, सरळीकरण व खोलीकरण करणे ही कामे लोकसहभागातून करून नदी / नाला/ नदी पुनर्जीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशी पुढाकार घेवून लोकवर्गणी / श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत अशा गावामध्ये घेण्यात आलेल्या नदी / नाला / नदी पुनर्जीवन कार्यक्रमांस प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून अभिसणाच्या माध्यमातून राबविण्यास दिनांक ८ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. नदी पुनर्जीवन कार्यक्रम अंतर्गत विविध जिल्हातील जिल्हाधिकारी यांचेकडून मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव प्राप्त होत आहेत. प्राप्त प्रस्तावातील काही प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. नदी पुनर्जीवन कार्यक्रम अंतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावर निर्णय घेण्यासाठी समिती गठीत बाब करण्याची शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

नदी पुर्नजीवन कार्यक्रमांतर्गत मान्य केलेले प्रस्ताव, प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव व यापुढे प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव एक समिती गठीत करुन त्यामध्ये तपासून मान्यता देणे आवश्यक आहे. यामुळे मा.मंत्री यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री यांचे सहअध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे एक समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| मा.मंत्री (जलसंधारण) | - | अध्यक्ष |
| मा.राज्यमंत्री (जलसंधारण) | - | सह अध्यक्ष |
| मा.सचिव (जलसंधारण) | - | सदस्य |
| मुख्य अभियंता, लघुसिंचन(जलसंधारण) पुणे | - | सदस्य |
| मुख्य अभियंता, वि.स.सि.वि.का नागपूर | - | सदस्य |
| अधिक्षक अभियंता लघुसिंचन(जलसंधारण) मंडळ पुणे | - | सदस्य |
| अधिक्षक अभियंता, लघुसिंचन(जलसंधारण) (प्रस्तावाच्या अनुषंगाने संबधित मंडळ) | - | सदस्य |
| उपसचिव (जलसंधारण) | - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव (जल-१) | - | सदस्य |
| अवर सचिव (जल-७) | - | सदस्य सचिव |

२. यापुर्वी मान्यता दिलेले सर्व प्रस्ताव हे अंदाजपत्रकाप्रमाणे दिलेले असुन आता मान्यता दिलेला प्रत्येक नदीचा एक detail project तयार करुन त्यास या समितीची मंजूरी घेण्याची दक्षता सर्व संबधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०४१०५९१४७४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2016.07.05 11:48:50 +05'30'

( वि. सि. वखारे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य,
६. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक,
८. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,
१०. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. विभागीय आयुक्त, सर्व
१२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,म.रा. पुणे
१३. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) म.रा. पुणे
१४. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) व वि.स.सिं.वि. कार्यक्रम, नागपूर,
१५. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१,
१६. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१७. केंद्रिय भूजल सर्वेक्षण विभाग, पुणे
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता),
२१. महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता),
२२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२४. सर्व अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण)
२५. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२६. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२७. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),/जिल्हा परिषद/जलसंपदा विभाग
२८. कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव जल-१ जलसंधारण विभाग़
२९. नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८. जल-७, निवड नस्ती.

.